Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# मराठवाड्यातील राजकारणात बंजारा समाजाचा सहभाग

**प्रा.अंकुशराव अंबादास चव्हाण**
राज्यशास्त्र विभाग
मत्स्योदरी कला महाविद्यालय,
तीर्थपुरी, ता, घनसावंगी, जि.जालना

बंजारा समाज हा भारतीय समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. देशातील 23 घटक राज्य आणि तीन केद्रं शासित प्रदेशात तो वास्तव्यास असुन अनेक नावाने ओळखला जातो. या समाजा मध्ये अनेक उपजाती आहेत. हा समाज पुर्वीपासुन भ्रमणशील राहिलेला आहे. परंतु मागील 100 वर्षांच्या काळात तो स्थिरावला आहे.त्यामुळे त्यांच्यामध्ये चांगले शिक्षण आणि जीवन जगण्याच्या योग्य साधनाची इच्छा वा आकांक्षा निर्माण झाली आहे. मुलत: शौर्य, काटकपणा, संर्घषशिलता, हा समाजाचा स्थायी भाव आहे. या समाजामध्ये अनेक सुधारक झाले. त्यापैकी मराठवाड्यातील पहिले समाजसुधारक कै.बळिराम हिरामण राठोड (किनवट) यांनी कोणत्याही प्रकाराच्या सामुदायिक संघटेची स्थापना न करता ही ख-या अर्थाने समाज सुधारण्यासाठी चळवळीच्या माध्यमातुन जनजागृती सुरु केली. वेशभुषा बदल करणे, शिक्षणाला प्रांरभ करणे, व्यसनाधिनता नष्ट करणे व तांड्यातील लोकांनी स्थिर जीवन जगावे. या साठी त्यांनी अहोरात्र परिश्रम केले.

महाराष्ट्रात बंजारा समाजाची लोकसंख्या सुमारे 50 लाख आहे. तर संपुर्ण भारतात बंजारा समाजाची लोकसंख्या सुमारे सात कोटी आहे. हा समाज भारता बरोबरच जगातील 12 ते 17 देशामध्ये “रोमा जिप्सी” या नावाने वास्तव्य करतो आहे. बंजारा समाजाच्या सुधारणा चळवळीची सुरुवात ख-या अर्थाने बळीराम हिरामण राठोड, फुलसिंग नाईक, बाबसिंग दगडूसिंग राठोड, हिरामण पवार, ताराचंद निर्माण झाले. तब्बल 23 वर्षे सतत महाराष्ट्राच्या राजकारणात राहून त्यांनी बहूजन समाजाबरोबर बंजारा समाजालाही विशेष महत्व मिळवून दिले.

बंजारा या शब्दाच्या उत्पत्ती विषयी अनेक मतमतांतरे आहेत. बंजारा हा शब्द बन+ज+अरी अशा तीन शब्दापासुन बनलेला आहे. ‘बनज’ याचा अर्थ वाणिज्य किंवा व्यापार असा होतो. एन्थोवेनच्या मते “बंजारा न तो केवल जंगलमे घुमनेवाला है। और नही चावल ले जानेवाला, बनजारा की सही उत्पत्ती पंजाबी के बनज या वजन शब्द से है”।

महाराष्ट्रात एकुण सहा विभागापैकी मराठवाडा हा एक विभाग होय. या मध्ये औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातुर, उस्मानाबाद असे एकुण

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

आठ जिल्हे असुन औरंगाबाद हे विभागीय शहर आहे.या विभागात अनेक प्रकारच्या जाती वा समुह वास्तव्य करुन आहेत. यातील बंजारा हा एक भटका व विमुक्त समाज आहे. मराठवाड्यात ज्या बंजारा तांड्याची लोकसंख्या जास्त आहे. त्या ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यात आला आहे. स्वतंत्र मतदारसंघ, राजकारणात स्त्रियांचा सहभाग लोकशाही पध्दतीने मतदानाची सोय या नव्या संकल्पना तांडा संस्कृतीमध्ये अस्तित्वात आलेल्या आहेत. पूर्वी या समाजामध्ये राजकीय व्यवस्थेत स्त्रिंयाचा सहभाग नगण्य होता. परंतु आज तो कमी अधिक प्रमाणात निर्माण होत आहे. तरी लोकसंख्येच्या प्रमाणात या समाजाला प्रतिनिधित्व मिळालेले नाही. ज्याप्रमाणे माळी समाजात धगन भुजबळ समता परिषदेच्या माध्यमातुन समाज प्रबोधन करीत आहेत.

वंजारी समाजात खा. गोपीनाथ मुंढे यांचे नेतृत्व आहे. दोन्ही समाजात शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. म्हणुन महाराष्ट्राच्या राजकीय सत्तेत या समाजाचे प्रभुत्व जाणवते. परंतु बंजारा समाज आज मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात असुनही राजकीय व्यवस्थेतही त्यांचा परिणामकारक सहभाग निर्माण झालेला नाही. त्यामुळे समाजात सर्वसमावेशक अशा नेतृत्वाची पोकळी निर्माण झालेली दिसुन येते.

**तक्ता क्र. १**

**मराठवाड्यात राजकीय प्रक्रियेमध्ये बंजारा समाजाचा सहभाग**

| जिल्हा | लोकसभा % | विधान परिषद % | जिल्हा परिषद % | पंचायत समिती % | ग्रामपंचायत % | नगर पालिका % | महानगर पालिका % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नांदेड | निरंक | 1(11.11) | 7(१०.९४) | 15(१२.०९) | ८९५(8.३९) | ४(१७.००) | निरंक |
| परभणी | निरंक | निरंक | 2(3.85 | 3(2.88) | 304(5.53) | 3(8.33) | निरंक |
| हिंगोली | निरंक | निरंक | 1(2.00) | 1(1.00) | 225(5.22) | निरंक | निरंक |
| जालना | निरंक | निरंक | 3(5.45) | 9(9.47) | 455(7.12) | 1(1.85) | निरंक |
| औरंगाबाद | निरंक | निरंक | 1(1.67) | 5(4.17) | 401(6.01) | निरंक | 2(2 .02) |
| बीड | निरंक | निरंक | 1(1.69) | निरंक | 398(5.08) | निरंक | निरंक |
| लातूर | निरंक | निरंक | 1(1.72) | निरंक | 255(3.96) | 2(3.22) | निरंक |
| उस्मानाबाद | निरंक | निरंक | निरंक | 3(2.78) | 183(3.49) | 2(11.76) | निरंक |

स्त्रोत: नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, औरंगाबाद, बीड, लातुर, उस्मानाबाद, या सर्व जिल्हयातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका, व काही महानगर पालिका यांचे सामान्य विभाग आणि लोकसभा, विधानसभा, यांचे शासन राजपत्र 2010

तक्तयानुसार असे निदर्शनास येते की, नांदेड जिल्हयातील एकूण 9 विधानसभा सदस्यापैकी बंजारा समाजाचा 1(11.11) सदस्य आहे. जिल्हयातील किनवट या मतदार संघात बंजारा समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रसचे शरद पवार यांनी दूरदृष्टी ठेवुन समाजाला येथे उमेदवारी दिली आणि विजय संपादन केला आहे. येथील

हदगाव, देगलुर, किनवट, मुखेड नगर परिषदेत प्रत्येकी 1(5.88) जिल्हा परिषद 7(10.94) पंचायत **समिती** 15(12.09) ग्रांमपंचायत 895 (8.39) हा राजकीय सहभाग मराठवाड्यातील बंजारा समाजाच्या मतदारसंघाचे दीर्घकालीन नेतृत्व या समाजाचे मा.खा. उत्तमराव राठोड यांनी इ.स. 1980 ते 1990 पर्यंत सलग दोन वेला नेतृत्व केले आहे.

मराठवाड्यातील राजकीय प्रक्रयेचा बंजारा समाजाच्या अनषंगाने विचार केला असता 2009 च्या लोकसभेमध्ये एकही प्रतिनिधी नाही. तर विधानसभेत केवळ एक आहे. नागरी स्वराज्य संस्थेत अत्यल्प आहे. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत समाजाच काही प्रमाणात सहभाग दिसुन येतो. परंतु अपेक्षित नाही. समाज आजपर्यंत समाजाचा राजकीय सहभाग अतिशय कमी आहे. याला समाजाच्या महिला देखील अपवाद नाही. समाज आजपर्यंत राजकीय दृष्ट्या अविकसित राहिलेला आहे. त्यांच्यामध्ये राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया अतिशय हळुवार आहे. मुलत: इतर प्रगत समाजापासुन दूर डोंगर द-यात उदरनिर्वाहासाठी भटकत राहिल्यामुळे व त्यांची भटकण्याची प्रवृत्ती कायम असल्यामुळे त्यांना राजकीय प्रक्रियेचे महत्व समजलेले नाही. समाजात जे काही थोडे नेतृत्व उद्यास आले. परंतु त्यांना राजकीय पाठबळ मिळालेले नाही. त्यामुळे बंजारा समाजाच्या परिणामकारक राजकीय सहभागाच्या काही मर्यादा आहेत.

मराठवाड्यातील इतर जिल्हयाच्या तुलनेत उस्मानाबाद जिल्हयात सर्वात कमी प्रमाणात बंजारा समाज वास्तव्यास आहे. येथील 8 पैकी 5 तालुक्यामध्ये ग्रामपंचायतीच्या सत्तेत त्यांचा सहभाग आहे. परंतु वाशी, भूम, परंडा, या तालुक्यात समाजाचा ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषदेमध्ये आढळुन आलेला नाही.

1) **उच्च शिक्षितांचे अत्यल्प प्रमाण**: बंजारा समाजमध्ये उच्च शिक्षितांचे प्रमाण अत्यल्प आहे. उच्च शिक्षणामुळे विकास कार्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनात बदल होत असतो. पुरोगामी दृष्टिकोनामुळे समाजाचे आणि आर्थिक प्रश्न सोडविण्यास मदत होत असते. शिक्षणाच्या बळावर नेता आपले विचार लोकांना पटवुन देतात त्यातुन समाज परिवर्तन घडुन येते. शिक्षण हे सर्वागीण विकासाचे प्रभावी साधन आहे. परंतु या बाबतीत समाजामध्ये असलेले अत्यल्प प्रमाण हे त्यांच्या परिणामकारक राजकीय सहभागातील मर्यादा ठरते आहे.

2) **आर्थिक कमकुवता**: राजकारणामध्ये आर्थिक बाजू बळकट असणे नेतृत्वासाठी आवश्यक आहे. त्यामुळे श्रीमंत कुटुंबाचे लोकच नेते होऊ शकतात. अशी धारणा निर्माण झाली आहे. व्यक्तीच्या जीवनात त्याच्या आर्थिक दर्जाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले

आहे. ज्या समाजाच्या प्राथमिक गरजा जेथे पूर्ण होत नसतील तेथे त्यांच्याकडुन कोणत्याही प्रकारची परिणामकारक राजकीय सहभागाची अपेक्षा करता येणार नाही.

3) **असंघटितपणा**: कोणत्याही समाजे राजकीय हीत संबंध नव्हे तर सर्वागीणहित संबंधाची पूर्तता करण्यासाठी त्यांच्याकडुन संघटितपणे प्रयत्न होणे गरजेचे आहे. परंतु मराठवाड्यातील बंजारा समाजामध्ये संघटितपणाचा अभाव असल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांचा परिणामकारक राजकीय सहभाग निर्माण होऊ शकलेला नाही.

4) **राजकीय पक्षाचा नकारात्मक दृष्टिकोन** :

सन 2009 त्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय कॉंग्रेस, भाजपा, शिवसेना, मनसे या महत्वाच्या राजकीय पक्षांनी या समाजाला एकही विधानसभेची उमेदवारी देऊन निवडुन आणण्याचा प्रयत्न केला नाही. मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेसने बंजारा समाजाच्या प्रदीप नाईक यांना किनवट विधानसभेची उमेदवारी देऊन निवडुन आणले आहे. परंतु इतर राजकीय पक्षांचा समाजाप्रती दृष्टिकोन नकारात्मक दिसुन येतो.

5) **समाजाची मर्यादित लोकसंख्या**:

लोकशाहीत निवडणुकीमुळे लोकसंख्येला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे बंजारा समाजाची मर्यादीत असलेली लोकसंख्या ही त्यांच्या परिणामकारक राजकीय सहभागाची मर्यादा आहे.

6) **शिक्षण प्रक्रिया समाजाच्या तळपातळीवर विकसित करणे**:

शिक्षण हे मनुष्याच्या विकासाचे प्रभावी साधन आहे. यामध्ये शाळा, महाविद्यालय, ही केवळ ज्ञानाची केंद्र नाहीत तर सामाजिकीकरणाची प्रमुख परिणामकारक माध्यमे आहेत. त्यामध्ये राज्यशासन, राजकीय पक्ष,राजकीय व्यवस्था, इ गोष्टी ते शिकतात. त्यामधुन प्रभावी राजकीय सामाजिकीकरण घडुन येते. प्रयोगात्मक अभिरुप (mock) संसद, शाळा, समिती, विद्यार्थी नेत्यांची निवडणुक यातुनच आदर्श राजकीय आणि सामाजिक संस्थांची ओळख होत. परंतु समाजाच्या राजकीय नेत्यांनी शिक्षण प्रक्रिया समाजाच्या तळपातळीवर विकसित त्यामुळे त्यांचा परिणामकारक राजकीय सहभाग निर्माण होऊ शकलेला नाही.

7) **समाजामध्ये राजकीय प्रबोधनावर चर्चासत्रे, जनजागृती, व्याख्याने यांचा अभाव** :

बंजारा नेत्यांनी राजकीय व्यवस्थेविषयी समाजात जनजागृती केलेली नाही. समाजाचे राजकीयीकरण समाजिकीकरण प्रभावीपणे झालेले नाही. व्याख्याने, जाहीर सभा. राजकीय पक्षाचे प्रचार साहित्य पुस्तिका, मोर्चे, परिषदा, प्रबोधनावर भाषणेस चर्चा सत्रे यामुळे समाजातील लोकांच्या राजकीय ज्ञानात भर पडते.त्यातुन परिणामकारक राजकीय सहभाग निर्माण होत असतो. परंतु या बाबतीत समाज बहुतांशी अनभिज्ञ आहे.

8) **वैचारिक मागासलेपणा**: बंजारा समाज आज राजकीयदृष्ट्या दिशाहीन आहे. राजकारणातील प्रश्न समस्या सोडविण्यासाठी एकुम समाजाचे म्हणुन कोणतेही नियोजन किंवा सर्वपक्षीय समन्वय असलेले दिसुन येत नाही.

9) **अंधश्रध्दा**: अंधश्रध्देपोटी देवी देवतांना बकरे बळी देणे, नवस करणे, पूर्वजांना मद्याचे नैवद्य देणे इ अनिष्ट चालीरीती रुढी परंपरा बंजारा समाजाला मागे नेणा-या आहेत. अज्ञान, अंधश्रध्देला तिलांजली दिल्याशिवाय या समाजाच्या परिणामकारक राजकीय सहभाग निर्णाण होणार नाही.

**सारांश**:

मराठवाड्यातील बंजारा समाज शेती आणि मजुराशी जोडलेला आहे. तो आर्थिकदृष्ट्या खुप दुर्बल आहे. तसेच अनेकविध समस्यांनी ग्रासलेला आहे. त्यामुळे आर्थिक दुर्बलता, निरक्षरता, राजकीय जाणिवांचा अभाव, मतदान प्रक्रियेविषयींची उदासीनता, व्यसनाधिनता, हुंडा पध्दती, वाईट रुढी परंपरा, भ्रष्ट झालेली सामाजिक व्यवस्था, स्वार्थी समाज नेतृत्व इ राजकीय प्रक्रियेमध्ये परिणामकारक प्रभाव समाजाचा दिसुन येत नाही. बहूसंख्य प्रमाणात तांड्यावर राहत असलेला हा समाज आपल्या वैविध्यपुर्ण सांस्कृतिक वारशाचे जतन करुन आधुनिक प्रवाहाशी कशा पध्दतीने जोडल्या जावे या विचारात आहे. त्यामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीयस सांस्कृतीक इ प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी नेतृत्वाने आणि शासनाने चांगले सहकार्य करुन समाजाने अधिक सजग व्हावे आणि त्याला आपला विकास करुन घ्यावा असे दिसुन येते.

**संदर्भ सुची**:

1) पांडे अनिलकुमार, बुधन बंजारा विशेषांक नोव्हेंबर-जानेवारी 2004 प्रकाशक महापंडित राहूल सांस्कृत्यायन प्रतिष्ठाण, दिल्ली

2) बळीराम हिरामण राठोड, गोर बंजारा इतिहास व लोकांचा इतिहास, प्रकाशक ब.पा.स्मारक समिती, यवतमाळ, 1973

3) आ. क.राठोड, गोर बंजारा इतिहास व लोकजीवन, गोरवट प्रकाशन मोहा, प्रथम आवृत्ती 1994, पृष्ठ क्र. 1,2

4) एन्थोवेन- ट्राईब्स एण्ड कास्टस ऑफ बॉम्बे भाग 2, पृष्ठे क्र.22

5) फुलसिंग जाधव, (संपादक) गोरवाणी (स्मरणिका ) प्रकाशन संयाजन समिती, पहिले गोरबंजारा साहित्य संमेलन, औरंगाबाद, जानेवारी 2003

६) पंजाब चव्हाण, बंजारा हस्तकलेची शोकांतिका, गौरव प्रकाशन, अमरावती, 2008

७) प्रा. डॉ. रुक्मिणी पवार, बंजारा लोकजीवन पध्दती, कैलास पब्लिकेशन्स,औरंगाबाद 2005